## जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान

१०.५९ जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान हा केंद्र शासनाचा महत्वाचा (फ्लॅगशीप) शहर आधुनिकीकरणाबाबतचा कार्यक्रम आहे. नागरी गरीबांना सेवा पुरविण्याच्या दृष्टीने झ ोपडपट्टयांचा एकात्मिक विकास घडविणाऱ्या प्रकल्पातंर्गत निवारा, मूलभूत सेवा आणि इतर संबंधित नागरी सुविधा उपलब्ध करुन देणे हा जवाहरलाल राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियानातंर्गत असणाऱ्या शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा व एकात्मिक गृहनिर्माण व  झोपडपट्टी विकास कार्यक्रम या दोन घटकांना मुख्य उद्देश आहे.

१०.५९.१ शहरी गरिबांकरिता मुलभूत सुविधा ही योजना बृहन्मुंबई,मीरा-भायंदर, ठाणे, कल्याण-डोंबिवली, पुणे, पिंपरी-चिंचवड , नाशिक, नागपूर, नांदेड या ९ महानगरपालिका आणि कुळगाव-बदलापूर या १ नगरपालिका क्षेत्रामध्ये राबविण्यात येत आहे.

१०.५९.२ एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम या योजनेंतर्गत शहरी गरिबांकरिता मुलभूत सुविधा कार्यक्रमांतर्गत सामाविष्ट असलेल्या महानगरपालिका वगळून, ८५ शहरांमध्ये ११९ प्रकल्पाव्दारे राबविण्यात येत आहेत.शहरी गरिबांकरिता मूलभूत सुविधा व एकात्मिक गृहनिर्माण व झ ोपडपट्टी विकास कार्यक्रम यांची प्रगती तक्ता १०.५५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५५ जवाहरलाल नेहरु शहरी पुनरुत्थान अभियान अंतर्गत शहरी गरिबांकरिता मुलभूत सुविधा**

**आणि एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम यांची प्रगती**

| राज्य | कार्यक्रम | मंजूर प्रकल्प | प्रकल्पाची एकूण किंमत (रु.कोटी) | घरकुल संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | घरकुल लक्ष्य | बांधण्यात आलेली घरकुले | प्रगतीपथावर असलेली घरकुले |
| महाराष्ट्र | १)शहरी गरिबांकरिता मुलभूत सुविधा (BSUP) | ५३ | ४१६९.६० | ९७१४७ | ८१०८५५ | ११८५५ |
| | २) एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम | ११९ | १९०३.५४ | ७७८८५ | ५८९८७ | १०७७७ |

# जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान कार्यक्रम

मा. पंतप्रधान यांनी दि. ०३/१२/२००५ रोजी "जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान कार्यक्रम" ही योजना जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत गृहनिर्माण व मुलभूत सुविधा पुरविण्याची तरतूद आहे. "शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे **(BSUP)** व "एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम" **(IHSDP)** हे कार्यक्रम जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान कार्यक्रमाचे उप कार्यक्रम असून बीएसयुपी ही योजना १४ शहरांकरिता व आयएचएसडीपी ही योजना २३३ शहरांकरिता लागू होती. परंतु BSUP योजना १० शहरात व IHSDP योजना ८४ शहरात राबविण्यात आली आहे. या योजनेचा वाढीव कालावधी मार्च २०१७ ला समाप्त झालेला आहे.

## अ) शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे (BSUP)

ही योजना महाराष्ट्र राज्य अंतर्गत १० शहरांमध्ये ( पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर, नाशिक, नांदेड, मुंबई, ठाणे, मिरा-भाईंदर, कल्याण-डोंबिवली, कुळगाव-बदलापुर, ) लागू आहे. पायाभुत सुविधांचे प्रकल्प तसेच गरिबांसाठी मुलभूत सुविधांसह घराचे बांधकाम यांचा या योजनेत समावेश आहे.

**१. केंद्र व राज्य शासनाच्या निधिच्या उपलब्धतेचे प्रमाण पुढीलप्रमाणे:**

| **घटक** | **निधीचा हिस्सा %** | | | |
|---|---|---|---|---|
| | **केंद्र शासन** | **र ाज्य शासन** | **स्थानिक स्वराज्य संस्था** | **लाभार्थी सरासरी** |
| घरकुल | ५० | ३० | ९ | ११ |
| बाहय सुविधा | ५० | २५ | २५ | ० |

**२. मंजूर योजनेचा तपशिल** **(रु. कोटीत)**

| **उप कार्यक्रम** | **मंजूर घरकुले दि. १७/०९/२०१५ च्या मंजूरीनुसार** | **प्रकल्प किंमत** | **केंद्रशासनाचा हिस्सा** | **राज्य शासनाचा हिस्सा ( ULB व लाभार्थी हिस्सा वगळून)** |
|---|---|---|---|---|
| (५३ प्रकल्प) | ९७१४७ | ४१६९.६० | २०८२.९६ | ६९९.१८३ |

**३. मंजूर योजनेची आर्थिक व भौतिक सद्यस्थिती** (रु. कोटीत)

| **उप कार्यक्रम** | **मंजूर घरकुले दि.१७/०९/२०१५ च्या मंजूरीनुसार** | **पूर्ण घरकुले** | **प्रगतीपथावरील घरकुले** | **केंद्राचा वितरीत निधी** | **राज्याचा वितरीत निधी** | **एकूण खर्च** |
|---|---|---|---|---|---|---|
| (५३ प्रकल्प) | ९७१४७ | ८१०५५ | ११८५५ | १७३५.९५ | ७४६.४८ | ४२६१.०९ |

**४. योजना राबविण्यास अपेक्षित प्रगती साधताना निदर्शनास आलेले मुद्दे**

**(स्थानिक स्वराज्य संस्थाच्या अहवालानुसार)**

४.१ बहुमजली इमारतीस लाभार्थ्यांचा विरोध

४.२ समुह पध्दतीच्या घरकुलांना लाभार्थ्यांचा विराध.

४.३ जमिन उपलब्ध होण्यास विलंब.

४.४ आरक्षण बदलाच्या प्रक्रियेस विलंब.

४.५ बांधकाम साहित्यात झालेली दरवाढ रेती व खडीची अनुपलब्धता

४.६ महाराष्ट्रातील दुष्काळी स्थिती.

**५. राज्य शासनाने योजना परिणामाकरक राबविण्यासाठी घेतलेले निर्णय**

५.१ पूर्व अर्हता प्राप्त कंत्राटदाराची सूची.

५.२ आगाऊताबा देणे विषयी राज्य शासन निर्णय.

५.३ दरवाढीमुळे लागणऱ्या निधीच्या पूर्ततेसाठी २.५ एफएसआय व त्यापैकी २५% वाणिज्य

वापरास परवानगी.

५.४ कॅडेस्टल सर्वे फी माफ.

५.५ पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप प्रस्तावास अनुमती.

## ब) एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP)

आयएचएसडीपी ही योजना १० लक्ष पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या नगरांसाठी आहे. सदर योजना महाराष्ट्रातील ८४ शहरांमध्ये राबविण्यात आली आहे.

**१. केंद्र व राज्य शासनाच्या निधीची उपलब्धता पुढीलप्रमाणे:**

| **घटक** | **निधीचा हिस्सा %** | | | |
|---|---|---|---|---|
| | **केंद्र शासन** | **र ाज्य शासन** | **स्थानिक स्वराज्य संस्था** | **लाभार्थी सरासरी** |
| घरकुल | ८० | ९ | ० | ११ |
| बाहय सुविधा | ८० | २० | ० | ० |

**२. मंजुर योजनेचा तपशिल**

(रु. कोटीत)

| **उप कार्यक्रम** | **मंजुर कार्यक्रम** | **प्रकल्प किंमत** | **केंद्रशासनाचा हिस्सा** | **राज्य शासनाचा हिस्सा (ULB व लाभार्थी हिस्सा वगळून)** |
|---|---|---|---|---|
| **११९ प्रकल्प (८४शहरे)** | **७७८८५** | **१९०३.५४** | **११६०.२०** | **४८५.८७** |

**३. मंजूर योजनेची आर्थिक व भौतिक सद्यस्थिती (जुलै - २०१९ )**

(रु. कोटीत)

| **उप कार्यक्रम** | **मंजूर घरकुले दि.१७/०९/२०१५ च्या मंजूरीनुसार** | **पूर्ण घरकुले** | **प्रगतिपथा वरील घरकुले** | **केंद्राचा वितरीत निधी** | **राज्याचा वितरीत निधी** | **एकूण खर्च** |
|---|---|---|---|---|---|---|
| ११९ प्रकल्प | ७७८८५ | ५८९८७ | १०७७७ | १०८४.४८ | २१८.४८ | १४१२.८५ |

**४. योजनेच्या मंद प्रगतीची कारणे**

(स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अहवालानुसार)

४.१ बहुमजली इमारतीस लाभार्थ्यांचा विरोध.

४.२ समुह पध्दतीच्या घरकुलांना लाभार्थ्यांचा विरोध.

४.३ जमिन उपलब्ध होण्यास विलंब.

४.४ आरक्षण बदलाच्या प्रक्रियेस विलंब.

४.५ बांधकाम साहित्यात झालेली दरवाढ रेती व खडीची अनुपलब्धता.

४.६ महाराष्ट्रातील दुष्काळी स्थिती.

४.७ न.प.स मोठे प्रकल्प राबविण्याचा अनुभव नसणे.

**५. राज्य शासनाने योजना परिणामकारक राबविण्यासाठी घेतलेले निर्णय**

५.१ पूर्व अर्हता प्राप्त कंत्राटदाराची सूची.

५.२ आगाऊ ताबा देणे विषयी राज्य शासन निर्णय. ( १९ जानेवारी २००९ व १८ फेब्रुवारी २०११)

५.३ राज्य शासनाने प्रती घरकुल किंमत १.२५ लक्ष (केंद्राच्या मंजूर घरकुल किंमत ८०,०००/१००,००० च्या उपरोक्त) प्रमाणे अतिरिक्त रक्कम उपलब्ध केली.

५.४ आयएचएसडीपी योजना पूर्ण करण्याकरिता घरकुल घटकाकरीता रु. १.२५ लक्ष पासून रु. २ लक्ष मर्यादेपर्यंत अनुदान देण्याबाबत शासन निर्णय दि. २८/०१/२०१४ जारी.

५.५ दरवाढीमुळे लागणाऱ्या निधीच्या पूर्ततेसाठी २.५ एफएसआय व त्यापैकी २५% वाणिज्य वापरास परवानगी.

५.६ कॅडेस्टल सर्वे फी माफ.

५.७ पी.पी.पी प्रस्तावास अनुमती.